राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदांसाठी मंजूर केलेल्या विकास योजनेतील सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित जागा ताब्यात घेतेवेळी तपासण्याच्या बाबींबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम-१५४ अन्वये निदेश.

**महाराष्ट्र शासन**
**निदेश**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-३२**
**दिनांक :२६/०४/२०१७**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना, अधिनियम,१९६६

क्र.टिपीएस-१८१६/प्र.क्र.५७३/१६/नवि-१३ :- ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना, अधिनियम, १९६६ (यापुढे उक्त "अधिनियम" उल्लेख केलेला) तरतूदीनुसार राज्यातील नियोजन प्राधिकरणाकरीता विकास योजना तयार करणेत येऊन त्यामध्ये विविध सार्वजनिक सेवा सुविधांकरीता आरक्षणे प्रस्तावित करण्यात येतात (यापुढे उक्त "आरक्षणे" उल्लेख केलेला);

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांच्या जागा ताब्यात घेतेवेळी उक्त अधिनियमातील कलम-१२६ मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित जमीन धारकास हस्तांतरणीय विकास हक्क / आर्थिक मोबदला मंजूर करुन ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून करण्यात येते;

आणि ज्याअर्थी, हस्तांतरणीय विकास हक्क / आर्थिक मोबदला मंजूर करुन ताब्यात येणाऱ्या अशा जमिनीचा वापर सदर आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी संबंधित प्राधिकरणाच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार **अनुज्ञेय** होत नसल्यास अशा जागा ताब्यात आल्यावरही विनाविकास पडून राहतात व त्यामुळे अशा जागांवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा जागा विकास हक्क हस्तांतरण / आर्थिक मोबदला मंजूर करुन ताब्यात घेणे उचित ठरत नाही;

त्याअर्थी, याअनुषंगाने राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-१५४ अन्वये खालील प्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

*"निदेश*

*विकास आराखड्यामधील प्रस्तावित आरक्षणाखालील जागा उक्त अधिनियमातील कलम-१२६ नुसार हस्तांतरणीय विकास हक्क / आर्थिक मोबदला देऊन ताब्यात घेताना प्रस्तावित आरक्षणाचा विकास संबंधीत नियोजन प्राधिकरणासाठी लागू असलेल्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतूदीनुसार अनुज्ञेय होईल किंवा कसे याबाबत आयुक्त / मुख्याधिकारी यांनी खातरजमा करावी व त्यानंतरच अशा जमीनी हस्तांतरणीय विकास हक्क / आर्थिक मोबदल्याच्या माध्यमातून ताब्यात घेण्यात याव्यात."*

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(रा.म.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI 32 सत्यमेव जयते

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा.राज्यमंत्री, (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रति,

१) संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) उप संचालक, नगर रचना तथा उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) आयुक्त, महानगरपालिका (सर्व महानगरपालिका) (शाखा कार्यालयामार्फत).

५) सह संचालक, नगर रचना, अंमलबजावणी कक्ष / मुल्यांकन / पुणे / कोकण / नाशिक / नागपूर / औरंगाबाद / अमरावती विभाग.

/- सदर निदेशाची प्रत नगर रचना विभागाच्या सर्व शाखा कार्यालयांना उपलब्ध करुन द्यावी तसेच संचालनालयाच्या वेब साईटवर प्रसिध्द करावी, ही विनंती.

६) सहायक संचालक, नगर रचना / नगर रचनाकार, सर्व शाखा कार्यालये, नगर रचना विभाग.

७) अवर सचिव, नवि-११/नवि-३० / कक्ष अधिकारी,नवि-९/नवि-१२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) मुख्याधिकारी, संबंधित नगरपरिषद (संबंधित शाखा कार्यालयामार्फत)

९) कक्ष अधिकारी (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना www.maharashtra.gov.in (कायदे व नियम) संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

१०) निवड नस्ती (कार्यासन-१३).